**इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११३/२०२२ मधील**
**निशाणी क्र. ५ खालील आदेश**
**CNR No.MHPU170025852022.**
**सौ.शिला गणेश कदम वगैरे वि. गणेश रामचंद्र कदम वगैरे.**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज, महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ गैरअर्जदार क्र.१ याच्याकडून दरमहा अर्जदार क्र.१ हिस रक्कम रु. ९,०००/-, अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रुपये ४,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी व घर भाडे म्हणुन दरमहा रक्कम रुपये ९,०००/- प्रमाणे मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथने व अर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद असा की, अर्जदार क्र.१ हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ याचेसोबत दिनांक १५.०५.२०१० रोजी झाले. गैरअर्जदार क्र.२ ते ५ हे अर्जदार क्र.१ हिचे अनुक्रमे सासरा, सासु, नणंद व नंदावा आहेत. लग्नानंतर, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना अर्जदार क्र.२ व ३ या मुली झाल्या. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस स्वयंपाक, कपडे धुणे यावरुन तसेच तिल्या मुली झाल्या म्हणुन तिला मारहाण, शिवीगाळ करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. एप्रिल २०२२ मध्ये गैरअर्जदार क्र.१ याने सातारा येथील राहत्या घरात अर्जदार क्र.१ हिस मारहाण करुन भांडगाव येथे तिच्या माहेरी नेवुन सोडले. त्यानंतर, गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हिस नांदविण्यास नकार दिला. सद्या, अर्जदार ही तिच्या आई-वडिलांकडे भांडगाव येथे कसेबसे जीवन व्यथित करीत असुन

अर्जदार क्र.२ व ३ हया शिक्षण घेत आहेत. अर्जदार यांच्या निवा-याची काहीएक सोय गैरअर्जदार क्र.१ याने केलेली नाही. अर्जदार क्र.१ हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याऊलट, गैरअर्जदार क्र.१ यास मौजे भांडगांव, ता.इंदापूर, जि.पुणे येथे बागायती शेतजमीन असुन त्यातुन त्यांना वार्षिक १,००,०००/- रुपये इतके उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा सातारा येथील खाजगी कंपनीमध्ये नोकरीला असुन त्यास दरमहा ७५,०००/- ते ८१,०००/- रुपये इतके वेतन मिळत आहे, म्हणुन अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार क्र.१ याने प्रस्तुत अर्जास त्याचे म्हणणे निशाणी क्र. २७ वर दाखल केले आहे. त्याने अर्जदार यांच्या अर्जातील मजकुर खोटा व बेकायदेशीर असुन तो त्यास मान्य नसल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदाराचे कथन की, अर्जदार क्र.१ ही त्याची पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ ही त्यांची अपत्ये आहेत. लग्न झालेपासुन २०२२ पर्यंत गैरअर्जदार याने अर्जदार हिस व्यवस्थित नांदवले असुन त्याने अर्जदार यांना लागणारा खर्च स्वतः केलेला आहे. अर्जदार क्र. २ व ३ यांच्या नावे सुकन्या समृध्दी योजनेअंतर्गत खाते उघडुन त्यामध्ये दरमहा जमेल तेवढे पैसे भरत आहे. तसेच अर्जदार क्र.२ हिच्या नावाने पॉलिसी काढलेली आहे. असे असता, अर्जदार हिने स्वतःहुन गैरअर्जदार यांचा त्याग केलेला असुन तो अर्जदार क्र.१ हिस नांदविण्यास तयार आहे. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.२ व ३ यांचा ताबा मिळण्यासाठी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा यांच्या न्यायालयात सिव्हील एम.ए.नं.१८/२०२३ हा

अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र.१ याचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले असुन त्याला दरमहा १०,०००/– रुपये पगार मिळतो. गैरअर्जदार याच्यावर त्याचे आई–वडील भावजय व तिचा मुलगा अवलंबुन आहे.

४. गैरअर्जदार क्र.१ याचे कथन की, अर्जदार क्र.१ ही पदवीधर असुन ती लोणी–देवकर येथील एम.आय.डी.सी.कंपनीमध्ये नोकरीस असुन तिला ८,०००/– रुपये उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार क्र.१ ही जि.प.शाळा भांडगाव येथे बदली शिक्षिका म्हणुन नोकरीस असुन तिला दरमहा २५,०००/– रुपये इतके उत्पन्न मिळते. अर्जदार क्र.१ हिचे आई–वडील भाऊ हे अर्जदार यांचा चांगला सांभाळ करीत आहेत. अर्जदार क्र.१ ही २५ तोळे सोन्याचे दागिने माहेरी घेवुन गेलेली आहे. अर्जदार क्र.१ व तिच्या भावाने जाणुन–बुजुन स्वतःहुन सातारा येथील इंग्लीश मेडीयम शाळेतुन भांडणे करुन त्यांचा दाखला घेवुन परस्पर आलेली आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास कोणतेही संयुक्तिक कारण घडले नाही, म्हणुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्याने केलेली आहे.

५. अर्जदार हिने यादी निशाणी क्र.३ सोबत मौजे भांडगांव, ता.इंदापूर, जि.पुणे येथील जमीन गट नं.१०८/१, ११७, १२०/२ यांच्या ७/१२ उता–यांच्या साक्षांकित प्रती, एफआयआर नं.८७९/२०२२ ची छायांकित प्रत, इ., कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचे मालमत्ता व देणीबाबतचे शपथपत्र अनुक्रमे निशाणी क्र.२० व २६ वर दाखल केलेले आहे.

६.          गैरअर्जदार क्र.१ याने यादी निशाणी क्र.२९ सोबत त्याचे पेमेंटच्या ०३ स्लीपस्, अर्जदार क्र.२ हिच्या नावाच्या पॉलिसीची व अर्जदार क्र.२ व ३ यांच्या सुकन्या समृध्दी योजनेअंतर्गत काढलेल्या पासबुकांची प्रमाणित प्रत आणि तीन फोटोग्राफस्  तसेच यादी निशाणी क्र. ३१ सोबत अर्जदार क्र.२ हिच्या शिकवणीच्या फी भरल्याच्या ०४ पावत्यांच्या प्रमाणित प्रती व मा.राजस्थान हायकोर्ट यांच्याकडील (२०१७)१ क्रि.एल.आर(राज.) ३७५ या न्यायनिर्णयाच्या प्रथम पानाची छायांकित प्रत  इ., कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत.

७.          अर्ज, म्हणणे व अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले तसेच दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात, त्यावर कारणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार यांनी हे सिध्द केले आहे काय की, मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार यांच्याकडुन अंतरिम पोटगी म्हणुन अर्जदार क्र.१ हिस रक्कम रु.९,०००/- व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रुपये ४,०००/- दरमहा प्रमाणे मिळण्यास पात्र आहेत? असल्यास किती? | अंशतः होकारार्थी.<br><br>अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ याच्याकडुन प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १,५००/-  प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २) | अर्जदार यांनी हे सिध्द केले आहे काय की, मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदार यांना गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडुन घर भाडे म्हणुन रक्कम रु.९,०००/- दरमहा प्रमाणे मिळण्यास पात्र आहेत? असल्यास किती? | नकारार्थी. |
| ३) | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता –**

८. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ हे पती–पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ या त्यांच्या मुली आहेत. तसेच, गैरअर्जदार क्र.२ ते ५ हे अर्जदार क्र.१ हिचे अनुक्रमे सासरा, सासु, नणंद व नंदावा आहेत, या बाबी वादातीत नाहीत. अर्जदार क्र.१ हिने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस स्वयंपाक, कपडे धुणे यावरुन तसेच तिल्या मुली झाल्या म्हणुन तिला मारहाण, शिवीगाळ करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. तसेच, एप्रिल २०२२ मध्ये गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस मारहाण करुन भांडगाव येथे तिच्या माहेरी नेवुन सोडले. याऊलट, गैरअर्जदार क्र.१ याचे कथन की, अर्जदार क्र.१ हिने स्वतःहुन गैरअर्जदार यांचा त्याग केलेला असुन तो अर्जदार क्र.१ हिस नांदविण्यास तयार आहे.

९. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या म्हणण्यांचा एकत्रीत विचार करता, आजरोजी अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांच्यासह तिच्या माहेरी रहात असल्याचे दिसुन येते. तथापि, अर्जदार क्र.१ ही तिच्या माहेरी रहात असल्यापासुन, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांच्या पालनपोषणाची काहीएक तजवीज केली किंवा कसे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचा पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचा पिता असल्याने अर्जदार यांचा सांभाळ करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी त्याचेवरती आहे. परंतु, गैरअर्जदार क्र.१ याने त्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी पार पाडल्याचे दिसुन येत नाही.

१०. अर्जदार क्र.१ हिचे कथन की, ती तिच्या आई-वडिलांकडे भांडगाव येथे कसेबसे जीवन व्यथित करीत असुन अर्जदार क्र.२ व ३ हया शिक्षण घेत असुन तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याऊलट, गैरअर्जदार क्र.१ यास मौजे भांडगांव, ता.इंदापूर, जि.पुणे येथे बागायती शेतजमीन असुन त्यातुन त्यांना वार्षिक १,००,०००/- रुपये इतके उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा सातारा येथील खाजगी कंपनीमध्ये नोकरीला असुन त्यास दरमहा ७५,०००/- ते ८१,०००/- रुपये इतके वेतन मिळते.

११. गैरअर्जदार क्र.१ याचे कथनानुसार, त्याचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले असुन त्याला दरमहा १०,०००/- रुपये पगार मिळतो. गैरअर्जदार क्र.१ याने

त्याच्या कथनांपुष्टयर्थ अर्जदार क्र.२ हिच्या शिकवणीच्या फीच्या दिनांक १५/०८/२०२१ ते दिनांक १७/१२/२०२१ या कालावधीतील ०४ पावत्यांच्या प्रमाणित प्रती, गैरअर्जदार क्र.१ च्या पेमेंटच्या ०३ स्लीपस्, अर्जदार क्र.२ हिच्या नावाच्या पॉलिसीची व अर्जदार क्र.२ व ३ यांच्या सुकन्या समृध्दी योजनेअंतर्गत काढलेल्या पासबुकांची प्रमाणित प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत.

१२. गैरअर्जदार याने दाखल केलेल्या अर्जदार क्र.२ हिच्या शिकवणीच्या पावत्यांचे अवलोकन केले असता, सदरहु पावत्या हया प्रस्तुत अर्ज दाखल होण्याच्या पुर्वीच्या आहेत. तसेच अभिलेखावरील गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.२ व ३ यांच्या सुकन्या योजनेअंतर्गत असलेल्या खाते पुस्तिकेच्या प्रतींचे अवलोकन केले असता, प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर दिनांक १८/०४/२०२३ रोजी प्रत्येकीच्या खात्यावर मात्र एकदाच रक्कम रुपये १,०००/– जमा केल्याची नोंद दिसुन येते. तथापि, प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांच्या पालनपोषणाची व अर्जदार क्र.२ व ३ यांच्या शिक्षणाची काहीएक तरतुद केली नसल्याचे दिसुन येते.

१३. अर्जदार क्र.१ हिने अभिलेखावर मौजे भांडगाव, ता.इंदापूर, जि. पुणे येथील जमीन गट नं.१०८/१, ११७, १२०/२ यांच्या ७/१२ उता–यांच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. सदर ७/१२ उता–यांवर गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांच्या नावावर जमीन असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१

याने त्याच्या मालमत्ता व देणी बाबतचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २६ मध्ये, तो कोपर कार्पोरेशन प्रा.लि. मध्ये नोकरी करीत असुन त्यास दरमहा रक्कम रुपये १०,०००/- पगार आहे व त्याला गट नं.१०८ मध्ये ००हे.७९ आर जमीन असल्याबाबत नमुद केले आहे. गैरअर्जदार याच्यावर त्याचे आई-वडील भावजय व तिचा मुलगा अवलंबुन आहे. अर्जदार क्र.१ ही पदवीधर असुन ती लोणी-देवकर येथील एम.आय.डी.सी.कंपनीमध्ये नोकरीस असुन तिला ८,०००/- रुपये उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार क्र.१ ही जि.प.शाळा भांडगाव येथे बदली शिक्षिका म्हणुन नोकरीस असुन तिला दरमहा २५,०००/- रुपये इतके उत्पन्न मिळते.

१४. अर्जदार क्र.१ हिने सदर शेतीपासुन गैरअर्जदारांना निश्चीत किती उत्पन्न मिळते व गैरअर्जदार क्र.१ यास दरमहा रक्कम रुपये ७५,०००/- ते ८१,०००/- इतका निश्चीत पगार मिळत असल्याबाबतचा सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा अर्जदार क्र.१ हिने अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच, गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिच्या उत्पन्नाबाबत केलेल्या कथनांपुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांची एकमेकांच्या उत्पन्नाबाबतची कथने व अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे ही पुराव्याअंतीच शाबीत होणार असुन आजरोजी प्रस्तुतचा अर्ज हा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे.

१५. अर्जदार क्र. १ हिच्या शपथेवरील कथनांवरुन, आजरोजी तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, असे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ हा नोकरी

करीत असुन त्यास शेती असल्याचे दिसुन येते. तथापि, गैरअर्जदार क्र.१ यास नोकरी व शेतीपासुन त्यास दरमहा चांगले उत्पन्न मिळणे स्वाभाविक आहे. गैरअर्जदार क्र.१ याच्यावर अर्जदार यांच्या पालनपोषणाची तजवीज करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी होती व आहे, ती त्याने पार पाडल्याचे दिसून येत नाही.

१६. वर नमुद गोष्टींचा एकत्रीत विचार करता, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,५००/– प्रमाणे अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन, मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्याचा आदेश होणे न्यायोचीत वाटते, म्हणुन मुद्दा क्र. १ करीता, अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता –</u>**

१७. अर्जदार क्र.१ हिने कथन केले आहे की, ती अर्जदार क्र.२ व ३ सोबत आजरोजी तिच्या माहेरी आई–वडिलांकडे रहात आहे. अर्जदार क्र.१ ही भाडयाने खोली घेवुन रहाते असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री अभिलेखावर दाखल नाही. तसेच, अर्जदार क्र.१ ही इतर अर्जदारांसोबत भाडयाच्या खोलीमध्ये रहात आहे असे तिचे कथन देखील नाही. अर्जदार क्र.१ ही तिच्या माहेरी रहात असल्याचे दिसुन येते, म्हणुन मुद्या क्र.२ करिता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता –</u>**

१८. मुद्दे क्र. १ व २ यांचे निष्कर्ष विचारात घेता, अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. ३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांना, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये १,५००/-(एक हजार पाचशे रुपये मात्र) प्रमाणे अंतरिम पोटगी, मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३) अर्जदार यांची अंतरीम घर भाडे मिळण्याबाबतची विनंती नामंजुर करण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRAKASH LALASAHEB PATIL
Date: 2023.08.10 10:55:41 +0530

इंदापूर. ( पी. एल. पाटील )
दिनांक –०८.०८.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

'' मी, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ.फाईलच्या आदेशातील मजकुर हा तिच्या मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दांनुसार समान आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | र. सि. पारवे,<br>लघुलेखक निम्नश्रेणी –३. |
| न्यायालयाचे नांव व पदनाम | - | पी.एल.पाटील,<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारीख | - | ०८/०८/२०२३. |
| आदेश न्यायिक अधिकारी यांनी स्वाक्षरित केल्याची तारीख | - | ०८/०८/२०२३. |
| आदेश सी.आय.एस.प्रणाली मध्ये अपलोड केल्याची तारीख | - | १०/०८/२०२३. |